# विषारी हवा

वायू प्रदूषणामुळे भारतात लाखो लोकांचा–विशेषतः गरिबांचा जीव जात आहे, हे वास्तव नाकारता येणार नाही.

केंद्रीय पर्यावरणमंत्री अनिल माधव दवे प्रदूषणाच्या मुद्द्यावर नकारार्थी प्रतिसाद देताना दिसतात. भारतात वायू प्रदूषणाची समस्या गंभीर बनल्याची वस्तुस्थिती त्यांना नाकारता येत नाही, पण देशाबाहेरच्या लोकांनी ही परिस्थिती आपल्यासमोर मांडलेली मात्र त्यांना आवडत नाही. बोस्टनस्थित 'हेल्थ इफेक्ट्स इन्स्टिट्यूट' व सिॲटलमधील 'इन्स्टिट्यूट फॉर हेल्थ मेट्रिक्स अँड इव्हॅल्यूएशन' या संस्थांनी संयुक्तरीत्या 'स्टेट ऑफ ग्लोबल एअर २०१७' हा अहवाल अलीकडेच प्रसिद्ध केला. वायू प्रदूषणामुळे होणाऱ्या मृत्यूंच्या आकडेवारीत चीनच्या तुलनेत भारताचा क्रमांक खूप खालचा लागतो, असं या अहवालात नोंदवलं होतं. यावर तक्रारवजा प्रतिक्रिया देताना दवे म्हणाले, आपण भारतीय लोक भारताबाहेरच्या गोष्टींनी खूपच जास्त प्रभावित होत असतो. आपल्या सैन्यावर माझा जितका विश्वास आहे तितकेच विश्वासू असलेले या विषयासंबंधीचे तज्ज्ञ आपल्या देशात आहेत, त्यांच्याकडे आपण लक्ष द्यायला हवं, असंही ते म्हणाले. विज्ञानातील तज्ज्ञ आणि सैन्य यांच्यातील ही विचित्र तुलना बाजूला ठेवून पाहिलं, तरी मंत्रिमहोदयांनी सदर अहवालाला दिलेला बचावात्मक प्रतिसाद गोंधळवणारा आहे. वायू प्रदूषणातील वाढीमुळे झालेल्या मृत्यूंची संख्या निश्चित करताना या अहवालात वापरण्यात आलेल्या पद्धतीविषयी काही लोक खुसपटं काढू शकतील, पण वाढतं अनारोग्य व मृत्यू यांना कारणीभूत ठरणारं हवा प्रदूषण ही भारतातील एक गंभीर पर्यावरणीय समस्या बनली आहे, हे मान्य करावं लागेल.

हवा प्रदूषणाची पातळी दाखवणारी अधिकृत आकडेवारी आणि 'ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज' (जीबीडी/आजारांचा जागतिक ताण) हा सखोल अहवाल यांच्या आधारे 'स्टेट ऑफ ग्लोबल एअर' हा अहवाल तयार करण्यात आला. यामध्ये वायू प्रदूषणाचे आरोग्यावर होणारे परिणाम जोखण्यात आले आहेत. १९९० ते २०१५ या २५ वर्षांच्या काळातील १९५ देशांमधील आरोग्यविषयक आकडेवारीचं संकलन जीबीडी अहवालात केलेलं आहे. दर वर्षी या संकलनाचं अद्ययावतीकरण केलं जातं. विविध देशांमधील लोकसंख्या, वयोगट व काळाचा मोठा पट यांना सामावून घेणारा हा अहवाल आरोग्यविषयक आकडेवारीची तुलना करण्यासाठी उपयोगी ठरतो. या माहितीला हवेच्या प्रदूषणासंबंधीच्या आकडेवारीची जोड दिल्यावर या प्रदूषणामुळे होणाऱ्या मृत्यूंची संख्या आणि त्यासंबंधित पंगुत्वाचे आजार यांची आकडेवारी काढता येते. यातील वायू प्रदूषणाची पातळी जोखताना विशेषकरून सूक्ष्म कण पदार्थ (फाइन पर्टिक्युलेट मॅटर: पीएम२.५) व ओझोन यांचा विचार केला जातो. या प्रदूषणकारी घटकांशी–विशेषतः पीएम२.५ दीर्घ काळ संपर्क आल्यास हृदयाशी संबंधित रक्तवाहिन्यांना बाधा पोचते आणि श्वसनाचे विकार निर्माण होतात, परिणामी आयुर्मान कमी होतं. खासकरून लहान मुलांना व वृद्धांना याचा जास्त त्रास होतो. ओझोनशी संपर्क आल्यास फुफ्फुसाचे गंभीर आजार उद्‌भवतात हे आता पुरेसं सिद्ध झालं आहे. या पार्श्वभूमीवर २०१५ या वर्षामध्ये हवा प्रदूषणामुळे जगभरात ४२ लाख मृत्यू झाले, त्यातील ५२ टक्के मृत्यू भारत व चीन इथं झाले, असं 'स्टेट ऑफ ग्लोबल एअर' अहवालात म्हटलं आहे. प्राणघातक हवा प्रदूषणाच्या वाढीचा दर मंदावण्यासाठी चीननं पावलं

उचलली आहेत, पण भारताचा दर मात्र चढता क्रमच दाखवतो आहे.

यामागील कारणं काही फारशी गूढ स्वरूपाची नाहीत. हवेतील प्रदूषणकारी घटकांचा तणाव कमी व्हावा, यासाठी कठोर उपाय अमलात आणले जायला हवेत, पण आत्तापर्यंत भारतातील सरकारांनी ही समस्या गांभीर्यानं घेतलेली नाही. दिल्लीसारख्या मोठ्या शहरांवरच लक्ष केंद्रित करून आपण लहान शहरांसमोरील संकटाकडे पूर्णतः दुर्लक्ष केलं आहे. जागतिक आरोग्य संघटनेनं २०१६ साली जगातील २० सर्वाधिक प्रदूषित शहरांची यादी प्रसिद्ध केली. यामध्ये १० शहरं भारतातील आहेत, त्यातील अलाहाबाद, कानपूर, फिरोझाबाद व लखनौ यांची परिस्थिती सर्वांत वाईट होती. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळानं २०१५ साली केलेल्या एका अभ्यासानुसार, देशातील तीन सर्वाधिक प्रदूषित शहरांमध्ये वाराणसीचा समावेश होता. हा अभ्यास 'आपल्या'च वैज्ञानिकांनी केलेला असल्यामुळे दवे यांना त्याकडे तरी दुर्लक्ष करता येणार नाही.

दिल्लीसारख्या शहरातील प्रदूषणाच्या पातळीची आकडेवारी मोजली जाते, कारण तिथं या मोजणीसाठी आवश्यक पायाभूत यंत्रणा उपस्थित आहे. वाराणसीमध्ये मात्र प्रदूषणाची पातळी मोजण्यासाठी केवळ तीन परीक्षण-यंत्रं आहेत, त्यातील केवळ एकाच यंत्रात पीएम२.५ घटकाची मोजणी होऊ शकते आणि या तीनपैकी कोणतंच यंत्र हवेच्या गुणवत्तेचा निर्देशांक दाखवू शकत नाही. याउलट दिल्लीमधील १३ परीक्षण-यंत्रांद्वारे पीएम१० व पीएम२.५ अशा दोन्हींची मोजणी होऊ शकते आणि ही यंत्रं हवेच्या गुणवत्तेचा दैनंदिन निर्देशांकही दाखवतात. आपल्या शहरांमधील वायू प्रदूषणाच्या व्याप्तीचं परीक्षण करण्यातही आपण अपयशी ठरत असू, तर इथल्या रहिवाशांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामाचा अंदाज आपण कसा बांधणार आहोत? वायू प्रदूषणाची मोजणी करण्यासाठी आवश्यक पायाभूत यंत्रणेची आपल्याकडील दुरवस्था पाहता, 'स्टेट ग्लोबल एअर' अहवालासारख्या अभ्यासांवर विसंबण्याखेरीज दुसरा काही पर्याय आपल्यासमोर आहे का? मंत्रीमहोदय सुचवतात त्याप्रमाणे मृत्यू व अनारोग्य यांच्याशी संबंधित वायू प्रदूषणाविषयी भारतीय तज्ज्ञ स्वतःचे अभ्यास सादर करत नाहीत तोपर्यंत आपण थांबण्याची गरज खरोखरच आहे का? खरंतर भारतभरातील शहरांमधून व गावांमधून विश्वासार्ह आकडेवारी जमवण्याचा प्रयत्न आपण प्रत्यक्षात केलाच, तर 'परकीय' अहवालापेक्षाही भीषण परिस्थिती समोर येण्याची शक्यता जास्त आहे.

हवेच्या ढासळत्या गुणवत्तेचा सर्वाधिक परिणाम गरिबांवर होतो, हे वास्तवही आपण सहजपणे विसरतो. आपल्या घरांसाठी महागडी एअरप्युरिफायर यंत्रं विकत घेऊन आणि एअरकंडिशन असलेल्या गाड्यांमधून फिरून श्रीमंत लोक स्वतःचं रक्षण करू शकतात. पण गरिबांना चालताना, किंवा सायकलवरून जाताना किंवा सार्वजनिक वाहतुकीचा वापर करताना खराब हवेत श्वासोच्छवास करण्याशिवाय दुसरा काही पर्याय नसतो. या रोजच्या विषारी हवेचा डोस त्यांना घ्यावा लागतोच, शिवाय त्यांची घरंही हवेशीर नसतात आणि बहुतेकदा अन्न शिजवण्यासाठी इंधन म्हणून लाकूड किंवा गाईच्या सुकलेल्या शेणाचा वापर ते करतात. या पार्श्वभूमीवर, संकटाची सूचना देणारा माहितीस्रोत कोणताही असू दे, परंतु सरकारनं या समस्येचं गांभीर्य लक्षात घेतलं नाही, तर अनारोग्य व अपुरं पोषण यांनी ग्रस्त असलेले लाखो गरीब लोक आणखी दुरवस्थेत जातील.

०००

# खाजगी संचय पुनर्वसन संस्था

'चिघळणाऱ्या दुहेरी ताळेबंदाच्या समस्ये'वर आर्थिक सर्वेक्षणातून प्रस्तावित करण्यात आलेला उपाय केवळ वरवरच्या मलमपट्टीसारखा आहे.

'अति सवलत दिल्या गेलेल्या कंपन्या आणि बुडीत कर्जानं जखडलेल्या बँका' यांचा वित्तीय तणाव अधिकाधिक वाढल्यामुळे 'चिघळणारी दुहेरी ताळेबंदाची समस्या' निर्माण झाली आहे. बड्या कंपन्यांकडे केंद्रित झालेल्या बुडीत कर्जांच्या प्रश्नाची समाधानकारक

हाताळणी करण्यात बँका अपयशी ठरल्या आहेत, त्यामुळे उद्योग क्षेत्राचं कर्ज व खाजगी गुंतवणूक खालावलेली असतानाही बँकांची थकीत कर्जं वाढतच आहेत. या पार्श्वभूमीवर तातडीनं केंद्रीय पातळीवरची 'सार्वजनिक क्षेत्र संपत्ती पुनर्वसन संस्था' (पॅरा: पब्लिक सेक्टर अॅसेट रिहॅबिलिटेशन एजन्सी) स्थापन करण्याची शिफारस 'आर्थिक सर्वेक्षण २०१५-१६' या अहवालात करण्यात आली आहे. सर्वांत मोठ्या व अवघड प्रकरणांमध्ये लक्ष घालून 'कर्ज कमी करण्यासाठी राजकीयदृष्ट्या कठोर निर्णय' ही संस्था घेईल, असं सर्वेक्षणकर्ते म्हणतात.

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी दिलेल्या कर्जाऊ रकमेपैकी एकषष्ठमांश रक्कम 'तणावाखाली' आहे- हे कर्ज 'थकीत' तरी आहे, किंवा 'पुनर्मुदती'चं तरी बनलं आहे किंवा माफ करण्यात आलं आहे. तणावाखालील कर्जांपैकी बहुतांश भाग 'थकीत कर्ज' मानण्यात आला आहे. 'ऊर्जानिर्मिती, पोलाद व दूरसंचार अशा पायाभूत क्षेत्रांमध्ये लाखो-करोडो रुपयांची गुंतवणूक' करणाऱ्या विशिष्ट बड्या कंपन्यांना बँकांनी दिलेल्या कर्जांवर आर्थिक सर्वेक्षण अहवालानं लक्ष केंद्रित केलं आहे (रस्ते व महामार्ग, बंदरं आणि नागरी उड्डयन या क्षेत्रांचाही उल्लेख इथं करायला हवा). या कंपन्यांकडून एक टक्क्याहूनही कमी व्याज मिळालेलं आहे, म्हणजे बँकांकडून घेतलेली कर्जं व परकीय व्यापारी कर्जं यांवरील देय व्याज भरण्याएवढं उत्पन्नही या कंपन्यांना मिळत नाही. परकीय व्यापारी कर्जाच्या संदर्भात कंपन्यांना जोरदार फटका बसला कारण रुपयाचं मोठं अवमूल्यन झालं, त्यामुळे रुपयांच्या हिशेबात कर्जपरतफेड आणि व्याज देणं महागात पडू लागलं. शिवाय 'चलनवाढीला लक्ष्य' करणारी आर्थिक धोरणं भारतीय रिझर्व बँकेनं राबवल्यामुळे सर्वसाधारण व्याजाचा दर वाढला.

रिझर्व बँकेनं औद्योगिक कर्ज पुनर्रचना योजनेद्वारे धनकोऐवजी ऋणकोच्या हिताचं धोरण आखलं. यामध्ये परतफेडीचा कालावधी वाढवण्यात आला, व्याजदर कमी करण्यात आले, काही कर्ज भांडवलाचं रूपांतर समभाग भांडवलात करण्यात आलं आणि वाढीव कर्ज देण्यात आलं. पण यातूनही कंपन्यांना कर्ज फेडता आली नाहीत. त्यामुळे पुनर्रचनेमागील हेतू साध्य झाला नाही. इथं काही 'नैतिकतेचं नाटक' सुरू नसल्याचं आर्थिक सर्वेक्षणात स्पष्टपणे म्हटलेलं असलं तरी पुनर्रचनेमुळे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना तोटा होऊन खाजगी गुंतवणूकदारांची वित्तीय उत्तरादायित्वातून सुटका झाली आहे.

खाजगी क्षेत्राला वर उल्लेखित पायाभूतसंबंधित अवकाशांमध्ये मोठ्या प्रमाणात आणणं, हा उदारीकरणाच्या कार्यक्रमाचा एक मुख्य भाग होता. औद्योगिक रोखे बाजारपेठ आणि उच्चउत्पन्न गटातील गुंतवणूकदार यांना प्रकल्पांसाठी आवश्यक वित्तपुरवठा जमवता आला नाही, त्यानंतर सरकारनं सरकारी-खाजगी भागीदारीचं धोरण अवलंबलं. निर्मितीचा व खर्च परताव्याचा कालावधी दीर्घ असलेल्या महाकाय प्रकल्पांच्या भांडवली खर्चासाठी दीर्घकालीन कर्जं देण्याकरिता सार्वजनिक बँकांवर दबाव आणण्यात आला. बहुतांश वेळा खाजगी बँका अशा प्रकल्पांना कर्जाद्वारे वित्तपुरवठा करण्याला इच्छुक नसत.

पण आत्तापर्यंत सर्व केंद्र सरकारांनी दुहेरी ताळेबंदाची समस्या निर्माण होण्याला पूरक वातावरण कायम ठेवलं आणि ही समस्या 'चिघळू' दिली. विद्यमान सरकारला यातून मार्ग काढावा लागेल. सार्वजनिक क्षेत्र संपत्ती पुनर्वसन संस्था हा यावरचा संभाव्य उपाय आहे का? ही संस्था बँकांकडून मोठी बुडीत कर्जं विकत घेईल आणि मग 'त्यावर उपाय करेल.' कर्जाला समभागात रूपांतरित करून नियंत्रक हक्क लिलावात काढणं किंवा कर्जकपात करणं, यांपैकी एक किंवा दोन्ही उपाय साधून औद्योगिक वित्तीय व्यवहार्यता टिकवण्याचं काम ही संस्था करेल. मोठ्या बुडीत कर्जांचा बोजा उतरल्यावर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना सरकार पुन्हा भांडवल पुरवेल आणि त्यांचं वित्तीय आरोग्य पुन्हा सुरळीत करेल. या संस्थेला पुढील तीन स्रोतांकडून वित्तपुरवठा होईल : सरकारी रोखे, खाजगी गुंतवणूकदारांना केलेली समभागविक्री आणि रिझर्व बँक.

पूर्व आशियात १९९०च्या दशकामध्ये निर्माण झालेल्या वित्तीय संकटानंतरच्या अनुभवातून शिकवण घेत हे 'सार्वजनिक संपत्ती पुनर्वसना'चं वाहन तयार झाल्याचं सांगितलं जातं आहे. वास्तविक, बुडीत संपत्तीला कमी किमतीत विकत घेणं, वित्तीयदृष्ट्या त्यात बदल घडवणं आणि नंतर लिलावामध्ये सर्वाधिक बोली सांगणाऱ्याला नियंत्रक समभाग विकणं, अशी या संस्थेची प्रस्तावित पद्धती आहे. यामध्ये खरेदीदार हे खाजगी समभाग निधीही

असू शकतात. हे प्रकल्प सार्वजनिक पायाभूत सुविधांशी संबंधित असल्यामुळे अखेरीस यातूनही सवलत मिळू शकते, त्यामुळे कमी सावधगिरी दाखवून अधिक जोखीम पत्करायचीही बोलीकर्त्यांची तयारी असू शकते. यातून आधीच्या तोट्याच्या दुरुस्तीचा खर्च आणखी वाढेल.

मूळ पुरस्कर्ता अथवा लिलाव जिंकणारा बोलीकर्ता यांचं वित्त भांडवल पूर्णपणे खाजगी वित्तीय नफानिर्मितीमध्ये 'गुंतवलं' जातं आहे आणि गुंतवलं जाणार आहे, ही यातील मुख्य समस्या आहे हे मान्य करायला हवं. मोठ्या प्रमाणात परकीय गंगाजळी साठवल्यामुळे बँकांकडे मोठी नकद वित्तीय संपत्ती तयार झाली, शिवाय रिझर्व बँक केवळ अंशतः साठा नियंत्रित करणार आहे, त्यामुळे निधीपुरवठ्याचीही समस्या निर्माण होईल. पुरेसं उत्पन्न असलेल्या, इतर वेळी अंतर्गत स्रोतांद्वारे आपल्या गुंतवणुकीला वित्तपुरवठा करण्याची क्षमता असलेल्या न-वित्तीय कंपन्याही आता वित्तीय संस्थांप्रमाणे वर्तन करू लागल्या आहेत. वित्तीय नफ्यासाठी त्या विविध व्यवसायांवर पैसे लावू लागल्या आहेत. पायाभूतसंबंधित प्रकल्पांमध्ये सहभागी होण्यासाठी खाजगी क्षेत्राला सर्व प्रकारच्या सवलती देण्यात येत असल्यामुळे न-वित्तीय उद्योगही वित्तीय नफ्याच्या अधिकाधिक संधी शोधत आहेत. यामध्ये आर्थिक संदर्भातील गुंतवणुकीला प्राधान्य नाही. भांडवली संचयप्रक्रियेमध्ये वित्तीय नफानिर्मितीवर अधिकाधिक भर दिला जाणं, हे 'दुहेरी ताळेबंद समस्ये'मागील खरं कारण आहे. यावर दीर्घकालीन उपाय करण्याऐवजी 'सार्वजनिक क्षेत्र संपत्ती पुनर्वसन संस्था' स्थापणं ही केवळ वरवरची मलमपट्टी ठरेल.

०००

---

# विद्यापीठांची युद्धभूमी

लोकशाही म्हणजे मतभिन्नता, याची जाणीव भारतातील विद्यापीठीय विद्यार्थी आपल्याला करून देत आहेत.

लोकशाहीची आघाडीची दलं आपल्या विद्यापीठांमधील युद्धभूमीवर लढत आहेत. राज्यसंस्थेच्या अधिकृत विचारसरणीशी सुसंगत नसलेली प्रत्येक अभिव्यक्ती 'राष्ट्रविरोधी' आहे आणि अशा अभिव्यक्तीचा धिक्कार करून तिचा बिमोड करायला हवा, असं वाटणारे काही लोक असतात. तर विद्यापीठं म्हणजे संकल्पनांची विनिमय केंद्रं आहेत, तिथं तरुण आणि चौकस मनांना विविध संकल्पनांचा शोध घेण्याची, संकल्पना मांडण्याची व त्यावर चर्चा करण्याची मुभा असणं अपेक्षित आहे, असं मानणारे काहीजण असतात. अधिकृत विचारसरणी लादू पाहणाऱ्यांचा प्रतिकार करण्यासाठी मुक्त अभिव्यक्तीचे पाठीराखे पुढं येताना दिसतात. अलीकडेच दिल्ली विद्यापीठाच्या रामजस महाविद्यालयात असा संघर्ष दिसून आला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (रास्वसंघ) व भारतीय जनता पक्ष (भाजप) यांचा पाठिंबा असलेल्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) या संघटनेनं 'निषेधाची संस्कृती' या परिसंवादात अडथळा आणला. जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील कार्यकर्ता व डॉक्टरेटचा विद्यार्थी उमर खालिद याला या परिसंवादासाठी वक्ता म्हणून निमंत्रित करण्यात आलं होतं. परिसंवाद उधळण्याच्या कृतीचा निषेध करण्यासाठी दुसऱ्या दिवशी काही विद्यार्थी व शिक्षक एकत्र आले. या विद्यार्थी व शिक्षकांवर अभाविपच्या गुंडांनी दगड आणि बाटल्या फेकून निष्ठुर हल्ला चढवला. पत्रकारांवरही या वेळी हल्ला करण्यात आला, पण मोठ्या संख्येनं उपस्थित असलेल्या दिल्ली पोलिसांनी अभाविपच्या गुंडांना थांबवण्यासाठी काहीही हालचाल केली नाही. अभाविपच्या सदस्यांविरोधात प्राथमिक माहिती अहवाल (एफआयआर) दाखल करण्याचं कामही पोलिसांनी केलं नाही. उलट मॉरिसनगर पोलीस स्थानकाच्या इथं एफआयआर दाखल करण्याची मागणी करणाऱ्या निदर्शकांवर पोलिसांनी लाठीमार केला.

सर्व प्रकारची टीका आणि आपल्या विचारसरणीविषयक कार्यक्रमाशी न जुळणारे सर्व आवाज दडपून टाकण्याची सध्याच्या सत्ताधाऱ्यांची भूमिका यातून पुन्हा एकदा दिसली. बौद्धिक अवकाशांची उलथापालथ करणं आणि उच्चशिक्षणाच्या संस्था काबीज करणं, हा संघ परिवाराचा आधीपासूनचाच कार्यक्रम आहे. पण यासाठी वादविवाद, चर्चा किंवा कोणत्याही प्रकारच्या तर्काचा वापर करण्याऐवजी धमकावणी, छळवणूक व हिंसा यांचा वापर

संघ परिवार करतो. बहुतेकदा राज्ययंत्रणेच्या मदतीनं हे केलं जातं. चालू वर्षाच्या सुरुवातीलाही अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील तुलनात्मक शासन व राजकीय सिद्धान्ताच्या प्राध्यापक निवेदिता मेनन यांच्याविरोधात जोधपूरमधील जय नारायण व्यास विद्यापीठाच्या कुलसचिवांनी पोलिसांकडे तक्रार दाखल केली. या विद्यापीठाच्या आवारात केलेल्या एका भाषणात मेनन यांनी काश्मीरसंबंधी कथितरीत्या काही विधानं केल्यासंदर्भात ही तक्रार करण्यात आली. त्यांच्या भाषणानंतर अभाविपच्या सदस्यांनी निदर्शनं केली होती आणि साहजिकपणेच मेनन यांना 'राष्ट्रविरोधी' असं संबोधण्यात आलं. या कार्यक्रमाच्या मुख्य आयोजक- जय नारायण व्यास विद्यापीठातील इंग्रजी विभागामधल्या सहायक प्राध्यापक राजश्री राणावत यांना नंतर निलंबितही करण्यात आलं. सप्टेंबर २०१६मध्ये महाश्वेतादेवी यांच्या 'द्रौपदी' या लघुकथेचं नाट्यरूपांतर सादर केल्यासंदर्भात हरयाणा केंद्रीय विद्यापीठातील स्नेहसत मानव आणि मनोज कुमार या दोन शिक्षकांना 'कठोर शिक्षा' करावी आणि त्यांना निलंबित करावं अशी मागणी करण्यात आली होती. हे नाटक 'राष्ट्रविरोधी' आहे, कारण 'त्यात भारतीय सैन्यदलांचं नकारात्मक चित्रण आहे', असं अभाविपच्या सदस्यांनी जाहीर केलं. वास्तविक, याच दरम्यान महाश्वेतादेवी यांचं निधन झाल्यानंतर त्यांच्या जीवनकार्याचा सन्मान देशभर केला जात होता.

गेला वर्षभराहून अधिक काळ हैदराबाद विद्यापीठ व जवाहरलाल नेहरू विद्यापीठ या ठिकाणांना युद्धभूमीचं स्वरूप आलंच आहे, त्यात आता आणखी विद्यापीठीय प्रांगणांची भर पडत आहे. ९ फेब्रुवारी २०१६ रोजी अफझल गुरूच्या फाशीसंबंधी वार्षिक निदर्शनांनंतर जवाहरलाल नेहरू विद्यापीठात मोठा गहजब झाला आणि 'राष्ट्रभक्त' व 'राष्ट्रद्रोही' अशी विभागणी करण्यात आली. त्यापूर्वी ऑगस्ट २०१५मध्ये दिल्ली विद्यापीठाच्या किरोडीमल महाविद्यालयात 'मुझफ्फरनगर बाकी है' या माहितीपटाचं प्रदर्शन थांबवून त्या ठिकाणी विध्वंस करण्याचं काम अभाविपच्या गुंडांनी केलं. आत्ताच्या घटनांप्रमाणे त्याही वेळी अभाविपनं या चित्रपटाला 'धर्मविरोधी' संबोधलं होतं आणि चित्रपटातील 'भावार्था'वर आक्षेप घेतला होता.

नरेंद्र मोदी सरकारनं २०१४ साली सत्ताग्रहण केल्यापासून उच्चशिक्षणाच्या संस्था एका विशिष्ट विचारसरणीच्या प्रभुत्वाखाली आणण्याचे प्रयत्न होत आहेत, त्याचे दाखले या प्रसंगांमधून मिळतात. या ध्येयप्राप्तीसाठी विविध साधनं वापरली जात आहेत. केंद्रीय चित्रपट प्रमाणीकरण मंडळ; भारतीय चित्रपट व दूरचित्रवाणी संस्था, पुणे; आणि भारतीय इतिहास संशोधन मंडळ, नवी दिल्ली अशा संस्थांच्या प्रमुखपदी रास्वसंघाच्या विश्वासातील व्यक्तींची नियुक्ती करण्यात आली. हैदराबाद विद्यापीठ व जवाहरलाल नेहरू विद्यापीठ इथल्या कुलगुरूंनी अभाविप आणि केंद्र सरकार यांच्या सूचनेवरून कृती करावी, अशी तजवीज करण्यात आली. विद्यापीठं आणि उच्चशिक्षण संस्थांच्या बौद्धिक अवकाशात मतभिन्नता व्यक्त करण्याला व प्रश्न विचारण्याला प्रतिकूल वातावरण निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सूचनेचं पालन करावं अन्यथा निलंबनाला सामोरं जावं लागेल, अशी धमकावणी शिक्षक आणि विद्यार्थ्यांना वारंवार दिली जाते आहे. 'राष्ट्रद्रोह्यां'बद्दल सातत्यानं वक्तव्यं करणारी राज्यसंस्था व मंत्र्यांनी त्यांच्या विद्यार्थी संघटनेला विद्यापीठांमध्ये गदारोळ माजवण्यासाठी वैधता आणि विश्वास मिळवून दिला आहे. सध्याच्या सत्ताधाऱ्यांविरोधात असणं म्हणजे 'राष्ट्रा'विरोधात असणं, असा स्पष्ट संदेश यातून दिला जातो आहे. हिंसा आणि धमकावणीच्या संस्कृतीमुळे स्वतंत्र विचारप्रक्रियेला व सत्ताधाऱ्यांच्या बहुसंख्याकवादी विचारसरणीच्या विरोधात असलेल्या सर्वांना धोका निर्माण होतो.

धमकावणीची सत्ता राबवण्यात रास्वसंघ व भाजप यांची आघाडी असली तरी आता अशा कृतींवर त्यांची मक्तेदारी राहिलेली नाही. उदाहरणार्थ, दिल्ली, राजस्थान, हरयाणा व आंध्र प्रदेशात अभाविपनं उपद्रव केला, तसंच अलीगढ मुस्लीम विद्यापीठाच्या विद्यार्थी संघटनेनं त्या विद्यापीठाच्या आवारातील एक बैठक रद्द करवली. जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील विद्यार्थी कार्यकर्ती शेहला रशिद हिनं फेसबुकवरील नोंदीत प्रेषित मोहम्मद यांचा कथितरीत्या अपमान केल्याचं सांगत याच विद्यार्थी संघटनेनं तिच्याविरोधात पोलिसांकडे तक्रार दाखल केली. विद्यापीठांच्या आवारातील संघर्षाच्या घटना वाढत आहेत आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अवकाश संकोचत चालला

आहे. यातून वाढती संकुचित वृत्ती दिसते आणि ही वृत्ती कोणत्याही विद्यापीठाच्या मूळ प्रेरणेच्याच विरोधात जाणारी आहे. विद्यापीठांमध्ये विविध विचारांवर चर्चा करता यायला हवी, नवीन संकल्पना मांडल्या जायला हव्यात आणि ज्ञात असलेल्या व स्वीकारल्या गेल्या संकल्पनांच्या कक्षांना आव्हान दिलं जायला हवं. राज्यसंस्थेच्याच प्रतिनिधींकडून (किंवा जमावाकडून) असे अवकाश नष्ट करण्याचे प्रयत्न होत असतील, तर अशा वेळी लोकशाहीचा गाभा असलेल्या लोकशाही मतभिन्नतेचा ऱ्हास थोपवू पाहणाऱ्यांना आपण साथ द्यायला हवी.

०००

---

# 'प्रादेशिक' पक्षांवर 'राष्ट्रीय' पक्षांचा वरचष्मा

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील भाजपच्या विजयामुळे प्रादेशिक पक्षांचा कमकुवतपणा उघड झाला आहे.

महाराष्ट्रातील शहरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षानं (भाजप) अनपेक्षितरीत्या लक्षणीय कामगिरी करून दाखवली. प्रादेशिक पक्षांचं अधिक बळ असलेल्या राज्यांमध्ये प्रभुत्व गाजवण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या इतर 'राष्ट्रीय' पक्षांना यातून अनेक धडे शिकण्यासारखे आहेत. शिवसेनेसोबत दीर्घकाळ भागीदारी करून भाजपनं महाराष्ट्रात पाय पसरले आणि आता शिवसेनेपासून फारकत घेतल्यावरही त्यांच्यापेक्षा भाजपची कामगिरी चांगली झाली. मुख्य विरोधकांपैकी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) यांची अवस्था दुबळी आहे, याचाही भाजपला लाभ झाला.

काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व मनसे या पक्षांमधील काही बड्या नेत्यांचं योग्य वेळी आपल्या पक्षात 'स्वागत' करण्याचा महत्त्वाचा डावपेच भाजपनं खेळला. यामुळे पक्षाच्या एकूण जागा वाढवण्याला मदत झाली. शिवाय, फलकांवर आणि प्रसिद्धीपत्रकांवर पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भाजपचा 'चेहरा' बनवून प्रचार करण्याची क्लृप्तीही कामी आली. राज्यातील जनता फडणवीस यांच्याकडे 'खास राजकारणी' व्यक्तिमत्त्व म्हणून पाहात नाही, त्यामुळे त्यांचा चेहरा प्रचारात वापरण्याचा फायदा पक्षाला झाला. बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर राजकीय अवकाशांमध्ये शिवसेनेच्या कृतींपासून स्वतःला दूर करण्याचं काम भाजपनं यशस्वीरीत्या केलं. याचसोबत २०१६च्या अखेरीला मराठा समुदायानं आरक्षणाच्या मागणीसाठी व ॲट्रॉसिटी कायदा अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम रद्द करण्यासाठी काढलेल्या मोर्चांचाही हातभार भाजपच्या विजयाला लागला असावा. मराठ्यांना शेतकी संकट व बेरोजगारीचा सामना करावा लागतो हे खरं, पण तरीही राज्यातील राजकीय व आर्थिक जीवनामध्ये मराठा समुदाय हा एक प्रभावशाली समाजघटक आहे. भाजप हा मराठा वर्चस्व असलेला पक्ष मानला जात नाही, त्यामुळे मराठेतर समुदायांमधील चिंताग्रस्त मतदार या पक्षाकडे वळले. महाराष्ट्राचं नेतृत्व केलेल्या मोजक्या मराठेतर मुख्यमंत्र्यांमध्ये फडणवीस यांचा समावेश होतो. मराठ्यांचे मोर्चे सुरू झाल्यापासून फडणवीस यांनी त्यांच्या बाजूनं या समुदायाला आश्वस्त करायचा प्रयत्न केला आणि 'सर्व लोकांना सर्व काही' आपण देऊ शकतो, अशा प्रकारची भूमिकाही त्यांनी ठेवली.

नोटाबंदीमुळे निर्माण झालेल्या रोषाचाही भाजपला फटका बसला नाही, असं दिसतं आहे. भाजपसोबतची युती तोडून स्वबळावर निवडणुकीत उतरलेली शिवसेना, आणि काँग्रेस किंवा राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यापैकी कोणीही निश्चलीकरणासंबंधीच्या जनक्षोभाचा निवडणुकीतील लाभासाठी वापर केला नाही. विविध घोटाळे आणि शेतकरी आत्महत्यांबाबत दाखवलेली उर्मट अनास्था यांमुळे २०१४ साली काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीला नामुष्कीचा पराभव स्वीकारावा लागला होता. या पार्श्वभूमीवर, हे पक्षही भाजपला आव्हान देण्याच्या अवस्थेत नव्हते. फडणवीस यांची स्वच्छ प्रतिमा व त्यांनी दिलेलं विकासाचं आश्वासन या गोष्टी भाजपच्या पथ्यावर पडल्या. ग्रामीण महाराष्ट्रामध्ये पिण्याच्या पाण्याचा

तुटवडा, खंडित वीजपुरवठा, खराब रस्ते, दुरावस्थेतल्या सार्वजनिक आरोग्य सुविधा, कल्याणकारी योजनांचे लाभार्थी निवडताना होणारा भ्रष्टाचार, पंचायतींमधील उच्चपदस्थांची उर्मट वागणूक अशा अनेक समस्या दीर्घकाळ आहेत. शिवाय, महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबई शहरासाठी ३७,०५२ कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद असूनही, नागरी विकासाच्या नियोजनातील अनागोंदी व ढासळत्या पायाभूत सुविधा यांनी या महानगराची दुरवस्था केली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेत चार कार्यकाळ पूर्ण केलेल्या शिवसेनेनं प्रस्थापितविरोधी जनमतापुढं टिकाव धरला, शिवाय अधिकच्या नऊ जागांवर विजयही मिळवला. पण राज्यपातळीवरच्या कामगिरीचा विचार केला तर शिवसेना आता प्रादेशिक अस्मितेच्या मुद्द्यावर विसंबून राहू शकत नाही, हे स्पष्ट झालं आहे. तरुण मुंबईकर (यामध्ये मराठी नागरिकही आले) प्रादेशिक व भाषिक अस्मितांवर जास्त लक्ष केंद्रित करणारे नसून शैक्षणिक व रोजगाराच्या आकांक्षांना त्यांच्या लेखी अधिक महत्त्व आहे. शिवसेना व्यापक पातळीवर लोकांना आकर्षून घेण्यासाठी प्रयत्नशील असली, तरी नव्या आकांक्षा असलेल्या तरुणाईपर्यंत पोचण्यासाठी या पक्षाला निराळा व्यूह रचावा लागेल. एकीकडे भूमिपुत्रांशी असलेले पारंपरिक संबंध टिकवून ठेवणं आणि दुसरीकडे आपल्याच पक्षाच्या दृष्टिकोनातून 'परप्रांतीय' असलेल्या वाढत्या लोकसंख्येशीही जुळवून घेणं, अशी शिवसेनेची कसरत सुरू आहे. पण तरीही मुंबईतील गुजराती व उत्तर भारतीय मतांसोबतच मराठी तरुणाईची मतं भाजपकडे जाण्यापासून रोखणं शिवसेनेला शक्य झालं नाही. शिवसेना हा नागरी पक्ष मानला जातो आणि या निवडणुकीत पक्षानं जवळपास पूर्णपणे मुंबई व ठाणे या शहरांवरच प्रचाराचं लक्ष केंद्रित केल्यानं हा समज दृढ झाला आहे.

या निकालांतून काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व मनसे यांच्या भवितव्याचा मार्गही पुरेसा स्पष्ट झाला आहे. आपली 'गरीबस्नेही' प्रतिमा व पूर्वीच्या नेत्यांनी केलेलं काम यांवर विसंबून राहणं काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसला आता आधाराला येणार नाही. भ्रष्टाचार व उर्मटपणा यांविरोधात असलेला रोष पाहता या पक्षांना आता पुन्हा मतदारांशी संवाद साधत नव्यानं आपला पाया पक्का करावा लागेल. पक्षांतर्गत मतभेद, अशा मतभेदांची जाहीर वाच्यता आणि पारंपरिक मतदारांना गृहीत धरणं यांबाबतीत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांना तातडीनं स्वतःत बदल घडवावा लागेल. मनसेचा तर या निवडणुकीत पूर्णच धुव्वा उडाला आहे. लोकांमध्ये जाऊन ठोस काम करण्याऐवजी दुराभिमानाला चुचकारण्याचं आळशी धोरण अंगिकारल्याचा परिणाम या पक्षाला भोगावा लागला आहे. परंतु महाराष्ट्रामध्ये या विरोधी पक्षांचं पुनरुज्जीवनही गरजेचं आहे, कारण केंद्रात व राज्यात विजयी सत्ताधारी पक्षाला सक्षम विरोधकच नसणं राज्याच्या भवितव्याच्या दृष्टीनं इष्टकारक नाही.

०००

# सुरक्षित गर्भपात सेवेचा अधिकार

वैद्यकीय गर्भपात अधिनियमातील दीर्घ काळ प्रतिक्षित सुधारणांना मंजुरी मिळायला हवी.

गरोदरपणाचे २० आठवडे ओलांडल्यानंतर गर्भपात करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी करणाऱ्या अनेक याचिका सर्वोच्च न्यायालयात अलीकडे सुनावणीला आल्या. 'वैद्यकीय गर्भपात अधिनियम, १९७१'मध्ये सुधारणा करण्याची तातडीची गरज आहे, हे यातून स्पष्ट झालं. गरोदर महिलेचा जीव धोक्यात असेल तरच, गरोदरपणाचे २० आठवडे ओलांडल्यानंतर गर्भपाताला परवानगी मिळण्याची सोय या अधिनियमातील एका कलमामध्ये केलेली आहे, त्यामुळे यासंबंधीच्या याचिका न्यायालयात करण्यात आलेल्या आहेत. गर्भविकृती असणं किंवा गरोदर महिलेच्या शारीरिक व मानसिक आरोग्याला धोका असणं, किंवा गर्भविकृती २० आठवड्यांनंतर आढळण्याची शक्यता असणं, अशा परिस्थिती या अधिनियमात दखलपात्र ठरलेल्या नाहीत. अशा वेळी न्यायालयात याचिका दाखल करून त्या-त्या प्रकरणानुसार डॉक्टरांच्या चमूच्या शिफारशींनुसार सुनावणी केली जाते.

या अधिनियमातील सुधारणा संसदेत २०१४

सालापासून प्रलंबित आहेत. अधिनियमातील यादीमध्ये नमूद असलेल्या विशेष गर्भविकृतींच्या संदर्भात गर्भपात करताना गरोदरपणाचा कालावधी मर्यादा ठरू नये, असं या सुधारणांमध्ये म्हटलं आहे. या सुधारणांना मंजुरी मिळाल्यास न्यायिक याचिका अनावश्यक ठरतील, कारण त्यानंतर नोंदणीकृत आरोग्यसेवादात्यांच्या मतानुसार गर्भपात करण्याला परवानगी मिळेल.

या सुधारणांमध्ये 'गर्भपाता'ची व्याख्याही केलेली आहे. शिवाय, वैद्यकीय पद्धती आणि शस्त्रक्रियेद्वारे गर्भपाताच्या पद्धतींमधील भेदही स्पष्ट केलेला आहे. त्यामध्ये आयुर्वेद, युनानी, सिद्ध व होमिओपॅथी या पद्धतींना अवलंबणारे डॉक्टर, रुग्णसेविका व सुईणी यांनाही 'नोंदणीकृत आरोग्यसेवादाते' मानण्यात आलं आहे. या समावेशाला ॲलोपथीच्या डॉक्टरांकडून काही विरोध होतो आहे. त्यांच्या मते, अशा आरोग्यसेवादात्यांना गर्भपाताची परवानगी दिल्यास त्यातून वैद्यकीय गैरप्रकार वाढतील. परंतु, आवश्यक प्रशिक्षण आणि प्रमाणीकरण यांद्वारे केवळ वैद्यकीय गर्भपातांनाच परवानगी देण्याचा सरकारचा प्रस्ताव आहे. प्रशिक्षणाद्वारे मध्यम पातळीवरील आरोग्यसेवादाते यशस्वी उपचार करतात, असं विविध अभ्यासांनी दाखवून दिलं आहे.

अशा तरतुदीमुळे गर्भपातासंबंधीच्या सेवेची उपलब्धता वाढेल, पण हे पोकळीमध्ये घडायला नको. असुरक्षित गर्भपात प्रक्रियांमुळे भारतात दर दिवसाला सरासरी दहा महिलांचा मृत्यू होतो. भारतातील एकूण गर्भपातांपैकी दोनतृतीयांश गर्भपात असुरक्षित असतात, आणि अधिकृत रुग्णालय व दवाखान्यांच्या कक्षेबाहेरच ते केले जातात. सेवेची अनुपलब्धतता व नोंदणीकृत आरोग्यसेवादात्यांकडून सेवा देण्यास नकार इथपासून ते कुटुंबाकडून दबाव येणं किंवा पाठिंबा न मिळणं, सामाजिक कलंक, आर्थिक मर्यादा व जागरूकतेचा अभाव आणि माहितीची उणीव असे विविध सामाजिक घटक याला कारणीभूत ठरतात. या घटकांमुळे बेकायदेशीर किंवा असुरक्षित गर्भपाताचा पर्याय महिला स्वीकारतात, तत्काळ गर्भनिरोधक औषधांचा गैरवापर केला जातो, मिफप्रिस्टोन व मिसोप्रोस्टोल अशा गर्भपातकारक औषधांचा उपयोग डॉक्टरांच्या सल्ल्याशिवायच केला जातो. सेहेचाळीस वर्षांपूर्वीच गर्भपाताला कायदेशीर स्वरूप मिळालेलं असूनही सुरक्षित गर्भपाताच्या सेवांची उपलब्धतता मात्र तोकडीच राहिलेल्या मोजक्या देशांपैकी भारत एक आहे. त्यामुळे गर्भपात अधिनियमाची व्याप्ती वाढवण्यासोबतच सुरक्षित, अधिकृत व नियामक गर्भपात सेवा सहज उपलब्ध व्हायला हवी.

लोकसंख्या नियंत्रणासंबंधीची चिंताग्रस्तता, आणि अपात्र व अनियामक गर्भपात सेवादात्यांकडे जाणाऱ्या महिलांच्या मृत्यूला प्रतिबंध करण्याची निकड, असे मुद्दे 'वैद्यकीय गर्भपात अधिनियम १९७१'मधील तरतुदींसाठी कारणीभूत ठरले. शिवाय, स्त्रीची निवड व स्वायत्तता हे आधी दुर्लक्षिण्यात आलेले मुद्देही आता प्रस्तावित सुधारणांमध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहेत. या सुधारणांनंतर २० आठवड्यांपर्यंत मागणीनुसार गर्भपाताला परवानगी मिळेल. त्याचसोबत, गरोदर महिलेचं आरोग्य धोक्यात असेल किंवा गर्भामध्ये शारीरिक अथवा मानसिक विकृती असेल तर २४ आठवड्यांपर्यंतच्या कालावधीमध्ये गर्भपाताची परवानगी मिळेल. गर्भनिरोधक औषधांचा परिणाम न झाल्याचं कारण देऊन गर्भपाताची मागणी करणाऱ्या महिलांच्या बाबतीत वैवाहिक स्थितीचा मुद्दा आड येणार नाही, हा या सुधारणांमधील मुद्दा स्वागतार्ह आहे. १९७१ सालापासून सामाजिक आणि वैद्यकीय परिस्थितीमध्ये प्रचंड बदल झालेले आहेत, त्यामुळे गर्भपात अधिनियमासारखे कायदे स्थितिशील राहू शकत नाहीत.

रोझलिंड पेतचेस्की म्हणतात त्याप्रमाणे, कुटुंब, राज्यसंस्था, मातृत्व आणि तरुण महिलेची लैंगिकता यांच्या अर्थांनाच आव्हान देणाऱ्या एका व्यापक विचारसरणीय संघर्षाचा गर्भपात हा एक आधार आहे. वरील सुधारणा या योग्य दिशेनं एक पाऊल टाकणाऱ्या असल्या, तरी अधिक व्यापक प्रश्नांकडेही लक्ष द्यायला हवं. गर्भनिरोधाच्या पर्यायांसंबंधी आणि आपल्याला गर्भपाताचा कायदेशीर अधिकार आहे यासंबंधी अनेक महिला जागरूक नसतात. महिलांना या पर्यायांची माहिती देणं आणि सुरक्षित व मानवी रीतीनं आवश्यक ती सेवा पुरवणं यांमध्ये आरोग्यसेवादात्यांची भूमिका महत्त्वाची ठरते. गर्भपातसंबंधी सेवा व गर्भनिरोधाची उपलब्धतता हा सार्वजनिक आरोग्याचा मुद्दा आहे आणि त्याकडे तसंच पाहिलं जायला हवं. स्त्रिया स्वायत्त व्यक्ती आहेत आणि

त्यांची शरीरं, लैंगिकता, प्रजननाच्या निवडी यासंबंधीचं आकलन करून घेऊन निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्यात आहे, अशी धारणा असायला हवी.

संसदेच्या विद्यमान सत्रामध्ये 'वैद्यकीय गर्भपात (सुधारणा) विधेयक, २०१७' मांडलं जाणार आहे. आपल्या कायदाकर्त्यांनी आणि आपण सर्वांनीही गर्भपातावर मनमोकळेपणानं संवाद साधायची वेळ आलेली आहे.

०००

---

# सहिष्णुतेला द्वेषाचं आव्हान

भारतात व अमेरिकेत संबंधित सरकारं द्वेषाला खतपाणी घालत आहेत.

अमेरिकेत द्वेषमूलक गुन्ह्याला बळी पडलेली व्यक्ती भारतीय असल्यामुळे अशा गुन्ह्याचा तिथल्या सरकारनं निषेध करावा, अशी मागणी भारत सरकार करतं; पण आपल्याच देशातल्या द्वेषमूलक गुन्ह्यांबाबत मात्र मौन धारण करतं, ही निःसंदिग्धपणे विरोधाभासी परिस्थिती आहे. कॅन्सासमधील ओलेद इथं श्रीनिवास कुचीभोतला यांची एका गोऱ्या इसमानं गोळ्या झाडून हत्या केली. 'आमच्या देशातून बाहेर निघा', असं हा इसम गोळ्या झाडण्यापूर्वी श्रीनिवास व दुसऱ्या भारतीयाकडे बघून ओरडला. श्रीनिवास व दुसरी भारतीय व्यक्ती कायदेशीररीत्या स्थलांतरित झालेले होते, या वस्तुस्थितीशी मारेकऱ्याला काहीच देणंघेणं नव्हतं. उघडपणे द्वेषमूलक असलेल्या या गुन्ह्याचा धिक्कार करणारं कोणतंही निवेदन अमेरिकी सरकारनं या घटनेला एक आठवडा उलटल्यावरही केलेलं नव्हतं. नंतर, २८ फेब्रुवारीला अमेरिकी प्रतिनिधीगृहासमोर केलेल्या संयुक्त भाषणात राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कॅन्सान्समधील गोळीबाराचा उल्लेख सुरुवातीला केला. त्यांच्या या सौम्य उक्तीचं वर्णन करताना भारतातील प्रसारमाध्यमांनी 'कठोर टीका' व 'धिक्कार' अशी अतिशयोक्त विशेषणं वापरली. वास्तविक ट्रम्प एवढंच म्हणाले की, '(आज) आपण धोरणांच्या आघाडीवर विभागलेलं राष्ट्र असलो, तरी अतिशय विकृत स्वरूपातील द्वेष व दुष्कृत्यांचा धिक्कार करताना आपण देश म्हणून एकत्र उभे राहतो' हे ज्यू सामुदायिक केंद्रं व ज्यू दफनभूमींची नासधूस व त्यांना देण्यात आलेल्या धमक्या आणि कॅन्सान्समधील गोळीबार या घटनांवेळी दिसून आलं आहे. परंतु अशा द्वेषमूलक गुन्ह्यांसाठीचं पूरक वातावरण आपल्या प्रशासनाची धोरणं व भाषणबाजी यातूनच तयार झालेलं आहे, यासंबंधी ट्रम्प यांनी चकार शब्दही काढला नाही. सात मुस्लीमबहुल देशांमधून स्थलांतरावर बंदी घालणारी घोषणा ट्रम्प यांनी केली होती, परंतु नंतर न्यायालयीन हस्तक्षेपानं यासंबंधीची अंमलबजावणी होऊ शकलेली नाही. अमेरिकेसह सर्वच देशांमधील विविध समाजगटांत पूर्वग्रह व परस्परांविषयी रोष रुजलेला असतो, पण प्रत्येकच देशातली सरकारं स्वत:च्या धोरणांचा परिणाम लक्षात घेत नसल्यामुळे ही दरी रुंदवण्याचं काम त्यांच्याकडून होत असतं.

अमेरिकेत आज जे घडतं आहे तेच भारतात गेल्या अडीच वर्षांमध्ये घडत आलं आहे. मे २०१४मध्ये नरेंद्र मोदी व भारतीय जनता पक्षानं लोकसभा निवडणुकांमध्ये विजय मिळवला, त्यानंतर व्यक्तींना लक्ष्य करणारे द्वेषमूलक गुन्हे वाढलेच, पण त्याचसोबत भारतातील मुस्लिमांना 'परके' मानण्याची प्रक्रिया जाणीवपूर्वक आणि क्रूरपणे गतिमान झाली. जमावाकडून होणाऱ्या हत्या आणि 'लव्ह जिहाद'सारखे आरोप, इथपासून ते उत्तर प्रदेशातील सध्याच्या निवडणूक प्रचारमोहिमांमध्ये मोदींकडून केली जाणारी छुपी सांप्रदायिक वक्तव्यं– या सगळ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर मुस्लिमांना भारतीय समाजातील त्यांच्या स्थानाविषयी वाढत्या अस्थैर्याच्या भावनेला सामोरं जावं लागतं आहे. ही परिस्थिती प्रत्यक्षात आणण्यासाठी द्वेषानं पछाडलेल्या सुट्या व्यक्ती किंवा सत्ताधारी पक्षाप्रमाणे हिंदुत्वाच्या प्रकल्पावर विश्वास ठेवणारे लहान गट व संघटना यांच्या कृती पुरेशा नसतात. अल्पसंख्याकांविरोधात कोणत्याही स्वरूपाच्या कृती केल्यास त्याविरोधात नाराजी व्यक्त केली जाणार नाही, अशा कृतींना झिडकारलं जाणार नाही किंवा त्यांचा

धिक्कारही होणार नाही, असा संदेश वरिष्ठ पातळीवरून दिला गेल्यानंतरच ही परिस्थिती निर्माण होते. उत्तर प्रदेशातील दादरी इथं मोहम्मद अखलाक यांची जमावानं हत्या केली, त्या वेळी आणि त्यासारख्या द्वेषमूलक गुन्ह्यांच्या प्रत्येक घटनेवेळी वरिष्ठ पातळीवरून भीषण मौन पाळण्यात आलं आहे. द्वेषमूलक गुन्ह्यांबाबत ट्रम्प यांनी ओझरताच उल्लेख केलेला असला तरी अशा बाबतीत मोदींपेक्षा ट्रम्प खूपच बोलले असं म्हणावं लागेल.

भारत व अमेरिकेतील घडामोडींमधील साधर्म्य एवढ्यावरच थांबत नाही. 'राष्ट्र' या शब्दाच्या व्याख्येमध्येही त्यांच्यात साधर्म्य दिसतं. अमेरिकेला पुन्हा महान करण्याबद्दल ट्रम्प वारंवार बोलतात. पण ही अमेरिका म्हणजे काय आहे? विविध राष्ट्रांमधील स्थलांतरितांना (यात मुस्लीमही आले) या अमेरिकेमध्ये जागा आहे का? की, अमेरिकेच्या तथाकथित गतगौरवाची पुनर्स्थापना करण्याच्या महायोजनेला असलेला धोका म्हणून मुस्लिमांकडे पाहिलं जाणार आहे? ट्रम्प यांनी ज्या भाषणात कॅन्सास गोळीबाराचा उल्लेख केला, त्याच भाषणात त्यांनी 'व्हॉइस' (व्हिक्टिम्स ऑफ इमिग्रेशन क्राइम एंगेजमेन्ट) या संस्थेची स्थापना करण्याचा प्रस्तावही मांडला. स्थलांतरितांच्या गुन्ह्यांना बळी पडलेल्या 'अमेरिकी' पीडितांची दखल घेण्याचं काम ही संस्था करेल. कथितरीत्या स्थलांतरितांनी मारलेल्या विविध पोलीस अधिकाऱ्यांचा ट्रम्प यांनी गौरव केला, पण त्यांच्या मते अमेरिकी असलेल्या लोकांकडून होणाऱ्या गुन्ह्यांपेक्षा स्थलांतरितांचे हे गुन्हे जास्त प्रमाणात घडतात किंवा कसं याचा तपशील त्यांनी दिला नाही. कोणत्याही निकषाशिवाय 'स्थलांतरित' हा शब्द वापरून ट्रम्प यांनी श्रीनिवास कुचीभोतला यांच्या मारेकऱ्यासारखी भूमिका असलेल्या लोकांना पूरकच भूमिका घेतली आहे. या लोकांच्या दृष्टीनं निराळी दिसणारी कोणतीही व्यक्ती, त्वचेचा निराळा रंग असलेली व्यक्ती, निराळी भाषा बोलणारी व्यक्ती, निराळा पेहराव असलेली व्यक्ती 'बेकायदेशीर स्थलांतरित' असते किंवा 'परकी' असते किंवा 'अमेरिके'ला धोका असते.

भारतात विद्यमान सरकारनं स्वतःच्या मतानुसार 'राष्ट्र' व 'राष्ट्रवादी' यासंबंधीचा कार्यक्रम निश्चित केला आहे. सर्व भारतीय हिंदू (विरोधी बाजू सिद्ध होत नाही तोपर्यंत) 'राष्ट्रवादी' असतात, तर सर्व भारतीय मुस्लिमांनी त्यांची 'राष्ट्रवादी' धारणा सिद्ध करणं कायमसाठी गरजेचं ठरतं. शिवाय सरकारवर व सरकारी धोरणांवर प्रश्नचिन्ह उमटवणारे; स्वतःचं भविष्य ठरवण्याच्या काश्मिरींच्या हक्काला समर्थन देणारे; काश्मीर, बस्तर व ईशान्येतील सुरक्षा दलांच्या हिंसाचाराचा निषेध करणारे; आणि प्रत्येक भारतीयाला अभिव्यक्ती स्वातंत्र्यामध्ये मतभिन्नता राखायचा अधिकार आहे असं सांगणारे–असे सर्व लोक 'राष्ट्रद्रोही' ठरतात. अलीकडेच भाजपशी संलग्न अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेनं दिल्ली विद्यापीठाच्या रामजस महाविद्यालयात 'कल्चर्स ऑफ प्रोटेस्ट' या परिसंवादाला उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांवर हल्ला केला. केंद्रीय गृह राज्यमंत्री किरेन रिजिजू यांच्या मते, हा हल्ला म्हणजे टोकाचे डावे आणि राष्ट्रवादी यांच्यातील विचारसरणीय संघर्ष होता. यात अर्थातच केवळ अभाविपचे सदस्य 'राष्ट्रवादी' ठरतात.

अशा प्रकारच्या धोकादायक दुहेरीकरणाला भारत व अमेरिका इथली सरकारं समर्थन देत आहेत. अभाविपसारख्या गटांना त्यांची 'राष्ट्रवादा'ची मांडणी लादण्यासाठीचा परवाना यातून मिळतो. अमेरिकेमध्ये सशस्त्र व्यक्ती व राज्यसंस्थेचे प्रतिनिधी त्यांच्या मते 'बेकायदेशीर' असलेल्या व 'राष्ट्रा'ला धोका असलेल्या लोकांना लक्ष्य करू शकतात आणि मारूही शकतात. शेवटी, अशी सरकारं आपल्या समाजांमध्ये द्वेषभावनेला खतपाणी घालण्याला जबाबदार ठरत असतात, आणि सहिष्णूता व संवादाचा अवकाश नष्ट करत असतात.

०००

**(अनुवाद– प्रतिनिधी)**

(EPW, 25 Feb. 2017 and 4 March 2017)

अंकाच्या वितरण आणि वर्गणीसंदर्भात
फक्त केदार देशमुख यांच्या
खालील फोन नंबरवर संपर्क साधावा.
**९९२२६०८६८७**